# प्रेस नोट

"दिवाळी बोनस म्हणून सरकारने रु. ७५०/- देऊन केली पोलीसांची थट्टा" अशा स्वरुपाच्या वस्तूस्थिती विपर्यस्त बातमी बाबतची वस्तुनिष्ठ माहिती.

- दरवर्षी मुंबई शहर पोलीस दलातील कार्यरत सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना दिवाळी सणानिमित्त शुभेच्छा देताना एक शुभेच्छा पत्र व त्यासोबत दिवाळी फराळ, मिठाई, छोटीसी भेटवस्तू इत्यादी चे वितरण केले जाते. सदरचा संपूर्ण खर्च मुंबई पोलीस कल्याण निधीतून करण्यात येतो आणि ही परंपरा मागील अनेक वर्षापासून सुरु आहे. सन २०२० मधील कोरोना प्रार्दूभावामुळे दिवाळी २०२० करीता शुभेच्छा पत्र आणि फराळ /मिठाई वाटप करणे शक्य झाले नव्हते. सन २०२१ साठी सुध्दा कोरोना रोगाच्या प्रादुर्भाव असल्याने आणि भेटवस्तू वितरित करताना येणा-या अडचणी टाळण्याच्या उददेशाने आयुक्तालय स्तरावर वाटप करण्यात येणाऱ्या भेटवस्तूंऐवजी 'पोलीस सबसिडीयरी कॅन्टीन' मधून पोलीस कर्मचारी यांना, त्यांचे पसंतीची व निवडीचे, दिवाळी सण साजरा करण्याकरिता लागणाऱ्या वस्तूंचे विनामुल्य वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- या निर्णयास अनुसरुन सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे आवडीची कोणत्याही गृहउपयोगी वस्तू मुंबई पोलीसांकरिता कार्यरत असलेल्या ६ पोलीस कॅन्टीन मधून खरेदी केल्यास त्यातील रु.७५०/- रुपयांच्या वस्तू विनामुल्य राहतील याबाबत पोलीस परिपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे. व ही योजना दि.३०/१०/२०२१ पासून कार्यान्वीत करण्यात आली आहे.
- सदरची योजना ही आयुक्तालय स्तरावरील 'पोलीस कल्याण निधी' ची असून त्याबाबत राज्यशासनाकडून कोणतेही अर्थसहाय घेतले जात नाही. सदरची रक्कम राज्य शासनाने दिलेला बोनस नाही. ही 'पोलीस कल्याण निधीची' अंतर्गत बाब आहे.
- या वस्तुस्थितीचा विपर्यास करुन काही प्रसारमाध्यमांनी खोटी, चुकीची आणि खोडसाळ बातमी प्रसिध्द केली आहे. बातमी प्रसिध्द करण्यापूर्वी कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्यांकडून योजनेची माहिती घेण्यात आलेली नाही. व राज्य शासनाची आणि पोलीस खात्याची प्रतिमा मलीन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे.

**पोलीस आयुक्त**
मुंबई